# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.10.2025** **वारःगुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टारमर यांच्यात आज मुंबईत द्वीपक्षीय बैठक
2. नवी मुंबई विमानतळ, मुंबई मेट्रो तीनचा अखेरचा टप्पा, आणि मुंबई वन ॲपचं पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण
3. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर
4. इस्राइल आणि हमास यांच्यात संघर्षविरामाबाबत सहमती झाल्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रॅम्प यांची घोषणा आणि
5. महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सामना

**पंतप्रधान-स्टारमर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टारमर यांच्यात आज मुंबईत द्वीपक्षीय बैठक होणार आहे. कीर स्टारमर दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर असून काल ते मुंबईत दाखल झाले. स्टारमर यांच्यासमवेत व्यापार शिष्टमंडळही आलं आहे. उभय देशांचे पंतप्रधान व्हिजन 2035 नुसार दोन्ही देशांदरम्यानच्या व्यापक राजनैतिक भागीदारीतल्या प्रगतीचा आढावा घेतील. भारत ब्रिटन व्यापक आर्थिक आणि व्यापार करारान्वये उपलब्ध संधींविषयी व्यवसाय आणि उद्योग प्रमुखांशी संवाद साधतील. त्याचबरोबर आज मुंबईत होणाऱ्या सहाव्या ग्लोबल फिनटेक महोत्सवामध्ये दोन्ही नेते सहभागी होत, उपस्थितांनी संबोधित करणार आहेत.

**गोयल-युके**

दरम्यान केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि ब्रिटनचे व्यापार वाणिज्य मंत्री पीटर काईल यांच्यादरम्यान काल मुंबईत व्यापार आणि गुंतवणूक भागीदारी संदर्भात द्विपक्षीय बैठक झाली. दोन्ही देशांच्या आर्थिक आणि व्यापार कराराच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी संयुक्त आर्थिक आणि व्यापार समितीची पुनर्स्थापना करण्यास उभय नेत्यांनी सहमती दर्शवली. येत्या पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापारात आणखी वाढ करणं, तसंच अत्याधुनिक उत्पादनं, डिजीटल व्यापार, स्वच्छ ऊर्जा आणि सेवा क्षेत्रातील सहकार्य आणखी बळकट करण्यावर या बैठकीत भर देण्यात आला.

**मुख्यमंत्री-ब्रिटीश शिष्टमंडळ**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही काल मुंबईत ब्रिटीश शिष्टमंडळाची भेट घेतली. महाराष्ट्र हे देशातलं सर्वाधिक उद्योगस्नेही राज्य आहे, इथं दळणवळणाच्या चांगल्या सुविधा उपलब्ध आहेत. विविध देशातील उत्कृष्ट विद्यापीठांसमवेत केलेल्या भागीदारीमुळे मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळही तयार होत आहे असं सांगून राज्यात उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**पंतप्रधान-नवी मुंबई विमानतळ**

पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक, तरुणांसाठी रोजगार संधी, हे विकसित भारताच्या दिशेने टाकलेलं मजबूत पाऊल असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. पंतप्रधानांच्या हस्ते काल नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. जगातली तिसरी सर्वात मोठी देशांतर्गत विमान वाहतूक बाजारपेठ असलेल्या भारताला, आगामी पाच वर्षांत विमान वाहतूक देखभाल दुरुस्तीचं जागतिक केंद्र बनवण्याचं उद्दीष्ट आहे असं पंतप्रधानांनी सांगितलं. या विमानतळाबाबत बोलताना पंतप्रधान म्हणाले...

**सभी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट एक ऐसा प्रोजेक्ट है जिसमें विकसित भारत की झलक है। ये छत्रपति शिवाजी महाराज की धरती पर बना है और इसका आकार कमल के फूल जैसा है। यानी ये संस्कृति और समृद्धि का जीवंत प्रतीक है। इस नए एयरपोर्ट से**

**महाराष्ट्र के किसान यूरोप और मिडल ईस्ट के सुपर मार्केट से भी जुड़ जाएंगे। यानी किसान की ताजा उपज, फल, फूल, सब्जी और मछुआरों के उत्पाद तेजी से ग्लोबल मार्केट तक पहुंच पाएंगे।**

या कार्यक्रमाला राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह केंद्रिय हवाई वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू, हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. या विमानतळामुळं देशातली अनेक ठिकाणं मुंबई आणि नवी मुंबईशी जोडली जातील. वर्षाला 9 कोटी प्रवाशांची वाहतूक करण्याची क्षमता असलेलं हे विमानतळ 2 लाख रोजगार निर्माण करेल, असा विश्वास राममोहन नायडू यांनी यावेळी व्यक्त केला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ राज्याच्या आणि देशाच्या आर्थिक विकासाचं नवं केंद्र ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विमानतळाचं भूमीपूजन केलं होतं याची आठवण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी काढली. तर पूरग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारनं मदत द्यावी असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं.

याच कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते मुंबई मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्याचं उद्घाटन करण्यात आलं; तसंच मुंबई वन ऍपचा प्रारंभ करण्यात आला. या सर्वसमावेशक वाहतूक ॲपच्या माध्यमातून मेट्रो, मोनोरेल, बस, उपनगरी रेल्वे आणि वॉटर टॅक्सी या सर्व वाहतूक साधनांसाठी एकाच तिकीटाची सुविधा मिळणार आहे.

**<u>राष्ट्रपती गुजरात</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर जात आहेत. त्या उद्या सोमनाथ मंदिरात दर्शन घेतील. तसंच गीर राष्ट्रीय उद्यानाला भेट देऊन स्थानिक आदिवासी समुदायाशी संवाद साधणार आहेत. शनिवारी त्या द्वारकेमध्ये द्वारकाधीश मंदिराला भेट देणार असून, त्यानंतर गुजरात विद्यापीठाच्या 71व्या पदवी प्रदान समारंभाला उपस्थित राहाणार आहेत.

**<u>राजनाथ</u>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर असून ते ऑस्ट्रेलियाची राजधानी कनबेरा इथं पोहोचले. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील संरक्षण आणि राजनैतिक संबंध अधिक मजबूत करण्याच्या उद्देशानं राजनाथ सिंह यांचा हा दौरा महत्त्वाचा आहे.

**<u>गाझा शांतता करार</u>**

इस्राइल आणि हमास यांच्यात संघर्षविरामाबाबत तसंच ओलिसांची सुटका करण्यासाठीही सहमती झाली असल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रॅम्प यांनी केली आहे. अमेरिकेच्या मध्यस्थीने आखलेल्या शांतता योजने अंतर्गत इस्रायल आणि हमासमध्ये ही सहमती झाली आहे. इजिप्तमधील शर्म अल-शेख इथं झालेल्या वाटाघाटींनंतर ट्रम्प यांनी ही घोषणा केली. शांतता कराराच्या पहिल्या टप्प्यात हमासने ताब्यात घेतलेल्या सर्व उर्वरित ओलिसांची सुटका केली जाणार असून इस्राइल गाझामधून टप्प्याटप्प्याने सैन्य माघारी घेणार आहे. इस्रायली अधिकारी, हमास आणि मध्यस्थ असलेल्या कतारनं गाझा शांतता कराराच्या पहिल्या टप्प्याला दुजोरा दिला आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी या घोषणेचे स्वागत केलं असून हा इस्रायलसाठी हा महत्त्वाचा दिवस असल्याचं म्हटलं आहे.

**<u>नोबेल</u>**

रसायन शास्त्रातला यंदाचा नोबेल पुरस्कार जपानच्या क्योटो विद्यापीठाचे सुसुमु कितागावा, ऑस्ट्रेलियाच्या मेलबर्न विद्यापीठाचे रिचर्ड रॉबसन आणि अमेरिकेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाचे ओमर याघी यांना जाहीर झाला आहे. रेणूंचा नवा आराखडा तयार केल्याबद्दल त्यांना या पुरस्कारानं गौरवण्यात आला. यामुळं वाळवंटातल्या हवेतून पाणी साठवणं, पाण्यातून प्रदूषित घटक काढणं यासारख्या गोष्टी सोप्या झाल्या आहेत.

**<u>तंबाखूमुक्त युवा</u>**

देशभरात आजपासून तंबाखूमुक्त युवा मोहिमेच्या तिसऱ्या आवृत्तीला प्रारंभ होणार आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय तसंच शिक्षण मंत्रालय संयुक्तपणे ही मोहीम राबवणार आहेत. तंबाखूमुक्त पिढी तयार करण्याचं केंद्र सरकारचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने

टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचं शिक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. ही राष्ट्रीय मोहिम दोन महिने सुरू राहणार आहे. या मोहिमेअंतर्गत प्रश्नमंजूषा, स्पर्धा, समुपदेशन यासह विविध उपक्रम आयोजित केले जातील.

**औषध केंद्र**

कोणतेही औषध बाजारात आणण्यापुर्वी त्याची चाचणी होईल याची दक्षता घ्यावी आणि संबंधित उपाययोजना कराव्यात असे निर्देश केंद्र सरकारने सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांतील औषध नियंत्रकांना दिले आहे. मध्य प्रदेशात कफ सिरपमुळे अलीकडे झालेल्या बालकांच्या मृत्यूप्रकरणाच्या पार्श्वभुमीवर हे निर्देश जारी करण्यात आले आहेत.

**सॅटकॉम परिषद**

इंडिया मोबाईल काँग्रेस 2025चे काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिल्लीत उद्घाटन झालं. या अंतर्गत स्पेस नेटवर्कसंबंधित सॅटकॉम शिखर परिषदेचं उद्घाटन काल केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते करण्यात आल. उपग्रह संप्रेषणामुळे देशातल्या दुर्गम भागही डिजीटल माध्यमातून जोडण्याचे केंद्र सरकारचे वचन पूर्ण होणार आहे. डिजीटल भारत निधी आणि युनिर्वसल ऑब्लिगेशन फंडच्या माध्यमातून सरकारनं दुर्गम अशा 38 हजार 260 गावांना जोडण्याचं अभियान हाती घेतलं आहे, त्यासाठी 40 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची गरज असल्याची माहिती शिंदे यांनी दिली.

**साखर निर्यात**

महाराष्ट्रात यंदाच्या हंगामात साडेबारा लाख हेक्टर क्षेत्रात उसाचे पीक झाले असून त्यामधून साधारण 110 ते 15 लाख मेट्रीक टन साखरेचं उत्पादन होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे उत्पादन 25 ते 30 लाख मेट्रीक अधिक होण्याचा अंदाज असून देशात साडेतीनशे लाख मेट्रीक टन साखर उत्पादन होईल असा अंदाज राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना म्हणजेच इस्मानं दिला आहे. त्यामुळे जादा साखरेची निर्यात करण्याची परवानगी देण्याची मागणी इस्माचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केली आहे.

**क्रिकेट**

महिला विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. विशाखापट्टणम् इथं दुपारी तीन वाजता सामना सुरू होईल. या स्पर्धेत श्रीलंका आणि पाकिस्तान विरुद्धचे सलग दोन सामने भारतानं जिंकले आहेत. या स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं पाकिस्तानचा 107 धावांनी पराभव केला. ऑस्ट्रेलियानं दिलेल्या 222 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ 37व्या षटकापर्यंत केवळ 114 धावाच करू शकला.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.